# ई–निविदा सूचना

खालील कामासाठी नामांकित संस्था/पुरवठादार/कंत्राटदार यांच्याकडून ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनुक्रमांक | वस्तू / कामाचे वर्णन | निविदा अर्ज फी (GST सहित) | बयाना रक्कम (EMD) |
|---|---|---|---|
| १ | संस्थेच्या नायगाव प्रक्षेत्र, ता.हवेली, जि.पुणे–४१२ ११० या प्रक्षेत्रासाठी १४,००० ब्रास काळी माती (तपशीलानुसार) हायवामध्ये माती भरणे, वाहतूक करणे व रॉयल्टीसह पुरवठा करणेबाबत.. | ₹१,१८०/– | ₹५०,०००/– |

टीप: सविस्तर माहितीसाठी MKCL संकेतस्थळ पहा: https://sugarmart.sets.co.in/

महत्वाची माहिती

१. ई–निविदा सूचना पुढील संकेतस्थळांवर उपलब्ध आहे:
   - www.vsisugar.com
   - https://sugarmart.sets.co.in

१. ई– निविदा सादर करण्याचा कालावधी दि. १३ फेब्रुवारी, २०२६ ते २७ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत राहील.
   ई– निविदा Sugarmart संकेतस्थळावर ऑनलाईन सादर कराव्यात.
२. ई– निविदा दि. २७ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत खालील कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे.
   - पॅन कार्ड
   - कंत्राटदार/व्यापारी/संस्था/उद्योग नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
   - पूर्वीच्या कामाचा अनुभव दर्शविणारी प्रमाणपत्रे
   - रॉयल्टी भरलेली पावती व वाहनांची संख्या
३. (Pre-Bid Meeting):
   - दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६, वेळ : दुपारी ३:००, स्थळ– वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी बु. ता. हवेली, जि. पुणे
४. कुठलेही कारण न देता दरपत्रक स्विकारण्याचा नाकारण्याचा अधिकार संस्थेस राहील.

## नियम, अटी व शर्ती

१. दरामध्ये मालवाहतूक, लोडिंग–अनलोडिंग, रॉयल्टी व सर्व करांचा समावेश असावा. जीएसटी कर स्वतंत्र नमूद करावा.

२. पुरवठादाराने संबंधित मातीचा नमुना मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक राहील. निर्दिष्ट तपशील व प्रयोगशाळा चाचणी अहवालानुसार माती पुरवठा न केल्यास संबंधित माती नामंजूर करण्यात येईल.

३. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून दर **१२० दिवस** वैध राहतील.

४. निविदा शुल्क व बयाना रक्कम (EMD) ऑनलाईन पध्दतीने अदा करावी.

५. खरेदी/काम आदेशानुसार काम **३० दिवसांत** पूर्ण करणे बंधनकारक आहे.

६. मालाची वाहतूक किंवा कामादरम्यान झालेल्या अपघातांसाठी संस्था जबाबदार राहणार नाही.

७. डिलिव्हरी चलन/बीजक सादर केल्याशिवाय माल उतरविण्यास परवानगी दिली जाणार नाही.

८. माल उतरविण्यापूर्वी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

९. कोणतेही आगाऊ देयक दिले जाणार नाही.

१०. निविदा उघडल्यानंतर पुरवठादाराने प्रस्ताव मागे घेतल्यास किंवा करार करण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

११. सर्व वादांबाबत महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१२. आयकर कायद्यानुसार लागू असलेला TDS बिलातून कपात करण्यात येईल.

१३. निवड झालेल्या पुरवठादाराने एकूण आदेश रकमेच्या रू.५०,०००/– जमा करून ₹५००/– च्या नॉन–ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर करार करणे आवश्यक आहे.

१४. मातीचा पुरवठा सुरू झाल्यानंतर व वापरकर्ता विभागाकडून समाधानकारक अहवाल सादर झाल्यानंतर, दर आठ दिवसांनी **देयक** अदा करण्यात येईल.

१५. हमी कालावधीपर्यंत सुरक्षा ठेव संस्थेकडे व्याजाशिवाय ठेवण्यात येईल.

१६. पुरवठादाराने/कंत्राटदाराने काम अपूर्ण ठेवल्यास, संस्था ते काम इतर पुरवठादार/कंत्राटदारामार्फत संबंधित पुरवठादाराच्या/कंत्राटदाराच्या जोखमीवर व खर्चाने पूर्ण करून घेईल.

# तपशील

सपाटीकरण केलेल्या मुरमाड जमिनीची प्रत सुधारण्यासाठी, वापरण्यात येणाऱ्या मातीची प्रत ही प्रामुख्याने चिकनमातीयुक्त पोताची (चिकनमाती किंवा ३० % पेक्षा जास्त clay loam माती ) असावी, ज्याची जलवाहकता (Hydraulic conductivity) अत्यंत कमी १ x १०$^{-७}$ सेमी/सेकंद), सामू (pH) तटस्थ ते मध्यम अल्कधर्मी (६.५–८.०), कमी क्षारता (< १ डीएस मीटर$^{-१}$) आणि धनभारित आयन विनिमय क्षमता (Cation Exchange Capacity) अधिक असणे आवश्यक आहे.